**नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग**
**ठाणे शाखा**

जा. क्र.बिशेप/बांप/मौ.म्हारळ(खुर्द)/ता.कल्याण/ससंठाणे/ ६०९

सहायक संचालक, नगर रचना,
ठाणे, जिल्हाधिकारी इमारत,
३ रा मजला, कोर्ट नाका,
ठाणे (प)
दुरध्वनी क्र.:-०२२/२५३४२७४४
ई-मेल-adtp_thane@rediffmail.com
दिनांक ७ /०४/२०१७

प्रति,
मा.जिल्हाधिकारी,
ठाणे.

विषय :- मौ.म्हारळ (खुर्द), ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.क्र.८/१, ८/२, १२/१ ते १२/७, १३/१, १३/२, १४/१ ते १४/४, एकूण क्षेत्र ५१०७०.०० चौ.मी. या जागेवर रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठीच्या बांधकाम नकाशास मंजूरीसाठी शिफारस मिळणेबाबत.

७/१२ धारक/जमीनमालक – श्री. विश्वनाथ रामचंद्र पनवेलकर व इतर
यांचे कु.मु.धारक - मे. थारवानी रियल्टी तर्फे प्रो.श्री.अनिल एच.थारवानी
वास्तुविशारद -- श्री. दिनेश बजाज.

संदर्भ :- १) मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील पत्र क्र. महसूल/कक्ष-१/टे-७/एनएपी एसआर-२१०/२०१३, दि.२३/०५/२०१६.
२) या कार्यालयाचे पुर्वसंदर्भ शिफारस पत्र क्र.६८, दि.१२/०१/२०१५
३) उपअधिक्षक,भूमि अभिलेख, कल्याण यांचा मोजणी नकाशा मोजणी मो.र.नं. ८११८/२०१४, दि.९/१/२०१५ व दि. २७/०३/२०१५
४) महाराष्ट्र अग्निशमन सेवा,सांताक्रुज मुंबई यांचे पत्र क्र.एमएफएस/५१/२०१४/२२३, दि.२६/०६/२०१४ व पत्र क्र.एमएफएस/५१/२०१६/६१७,दि.२१/११/२०१६
५) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग,ठाणे यांचे या कार्यालयास पत्र क्र. रामवि/रेशा/४७९, दि.०३/०३/२०१७.
६) अर्जदार यांचे वास्तुविशारद यांनी या कार्यालयास सादर केलेले दि.३०/०३/२०१७, दि.३१/०३/२०१७ व दि.६/०४/२०१७ रोजीचे नकाशे.

महोदय,

संदर्भित पत्र क्र.१ अन्वये मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांचेकडून मौ.म्हारळ (खुर्द), ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.क्र.८/१, ८/२, १२/१ ते १२/७, १३/१, १३/२, १४/१ ते १४/४, एकूण क्षेत्र ५१०७०.०० चौ.मी. या जागेवर रहिवास व वाणिज्य या प्रयोजनासाठीच्या बांधकाम परवानगी नकाशांना मंजूरीची शिफारस मिळणेबाबत प्रस्ताव या कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे.

विषयांकित प्रकरणी अर्जदार यांची जागा मंजूर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीत समाविष्ट असून अंबरनाथ, कुळगांव-बदलापूर परिसर अधिसूचित क्षेत्राच्या म्हारळ-वरप मंजूर विकास योजनेमध्ये मौ.म्हारळ(खुर्द), ता.कल्याण येथील स.क्र.८/१, ८/२, १२/१ ते १२/७, १३/१, १३/२, १४/१ ते १४/४, एकूण क्षेत्र ५१०७०.०० चौ.मीही जमिन रहिवास विभागामध्ये अंतर्भूत होत आहे.

सदर जागेस मुळ मोजणी नकाशावर दर्शविलेल्यानूसार राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ वरुन उपलब्ध असल्याचे दिसून येते. सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील ना हरकत दाखला दि. /१२/२०१६ व दि. ३/०३/२०१७ सदर जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुधारीत रस्ते विकास योजना (सन-२००१-२०२१) नकाशानूसार विषयांकित जमिनीच्या दक्षिणेलगत जाणारा अस्तित्वातील राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ हा वर्गीकृत रस्ता असून त्यानूसार सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा रस्त्याची रुंदी इमारत रेषा व नियंत्रण रेषेनूसार ना-हरकत दाखला दिलेला आहे.

अर्जदार यांनी तळ + ७ मजला बांधकाम परवानगी प्रस्ताव सादर केलेला असून त्यास अग्निशमन विभागाचा दि.२६/०६/२०१४ व दि.२१/११/२०१६ रोजी ना-हरकत दाखला सादर केलेला आहे. तसेच अर्जदार यांच्या प्रस्तावाखालील क्षेत्र ५१०७०.०० चौ.मी. असून प्रस्तावास पर्यावरण विभागाची दि.२९/९/२०१४ रोजीची मान्यता प्राप्त आहे.

सबब, अर्जदाराने सादर केलेले बांधकाम नकाशे सर्वसाधारणपणे विकास नियंत्रण नियमावलीनुसार असल्याने उपरोक्त जागेवर रहिवास व वाणिज्य या प्रयोजनासाठीच्या बांधकाम नकाशास मंजूरीची शिफारस खालील अटी व शर्तींना अधिन राहून करण्यात येत आहे.